सादर, दि.१० .०७.२०१९

शिक्षण शुल्क समितीच्या दि.१५.०५.२०१९ च्या बैठकीच्या इतिवृत्तातील मुद्दा क्र. १० नुसार, शिक्षण शुल्क समिती व शुल्क नियामक प्राधिकरण या दोहोंमधील प्रस्ताव मागणीचा नमुना अर्ज, नियमावली व शुल्क निश्चितीचे सुत्र यात असलेली तफावत दूर करण्यासाठी डॉ. माणिकराव गुरसळ, (भाप्रसे) सदस्य सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या उपसमितीची बैठक दि.०४.०६.२०१९ रोजी दु. १२:३० वाजता शिक्षण शुल्क समिती, शासकीय अध्यापक महाविद्यालय, एल्फिस्टन तांत्रिक विद्यालय आवार, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीतील शिफारशी शिक्षण शुल्क समितीच्या मान्यतेस्तव ठेवण्यासाठी ही सर्क्युलेशन बैठक आयोजित केलेली आहे. यात सोबत बैठकीचे इतिवृत्त तसेच शुल्क नियामक प्राधिकरणाचे शुल्क निश्चिती संदर्भातील सद्यस्थितीतील नियम, शिक्षण शुल्क समितीचे सद्यस्थितीतील नियम व डॉ. गुरसळ यांच्या समितीने शिक्षण शुल्क समितीचे शुल्क निश्चितीसंदर्भात प्रस्ताव मागविणेचे नियमावलीत सुचविलेले बदल याचा तौलनिक तक्ता जोडलेला आहे. तसेच डॉ. गुरसळ यांच्या समितीने सूचविलेल्या शिफारशींप्रमाणे शिक्षण शुल्क समितीची शुल्क निश्चिती संदर्भातील नियमावली व नमुना अर्ज जोडलेला आहे. तरी यासंदर्भात खालील मुद्दयांच्या बदलास आपली मान्यता मिळावी.

## बैठकीचे मुद्दे

१.डॉ. माणिकराव गुरसळ समितीच्या शिफारशी स्विकारण्यास मान्यता मिळणेबाबत.

२.डॉ. गुरसळ समितीच्या शिफारशीनुसार तयार करण्यात आलेल्या नमुना अर्ज व नियमावलीस मान्यता मिळणेबाबत.

३.डॉ. गुरसळ समितीने शुल्क नियामक प्राधिकरण प्रस्ताव मागविण्यासाठी अवलंबत असलेली पध्दत स्विकारण्याच्या दृष्टीने

अ. समितीचे स्वतंत्र बँक बचत खाते उघडावे.

ब. प्रक्रिया शुल्क गोळा करून त्यातून समितीच्या आज्ञावलीमार्फत प्रस्ताव मागविणेकरता आज्ञावली तयार करणे,

क. शासनाच्या क्लाउडवर जागा भाडयाने घेणे,

ड. हाय स्पीड इंटरनेट (लिजलाईन),

इ. सा.बां.विभागाने ठरविलेल्या दराने रोजंदारी तत्त्वावर आवश्यकतेनुसार जास्तीत जास्त ६ महिन्याच्या कालावधीसाठी दोन आय. टी. असीस्टंट, एस. एम. एस—ईमेल व्दारे महाविद्यालयांना कळविण्यासाठी दोन प्रोग्रमर

इत्यादीबाबींसाठी होणारा खर्च आहे. त्या खर्चासाठी महाविद्यालयांकडून प्रस्ताव सादर करवताना महाविद्यालयांच्या झालेल्या खर्चावर ०.५ टक्के प्रक्रीया शुल्क गोळा करण्यास परवानगी मिळणेबाबत. त्यातून समितीचा, समिती व उपसमितीच्या बैठकीचा, समिती सदस्यांचा बैठकांसाठी होणारा खर्च भागवावा.

४. शिक्षण शुल्क समिती कार्यालय व समिती यांचे स्वतंत्र अस्तित्व असावे

Scanned by CamScanner

५. सद्यस्थितीत शिक्षण शुल्क समितीकडे निधी उपलब्ध नाही त्यामुळे तो उपलब्ध होईपर्यंत ऑफलाईन प्रस्ताव मागविण्यास परवानगी मिळावी.

सहसंचालक,
शिक्षण शुल्क समिती, मुंबई

मा. सदस्य सचिव,
शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा
मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे

मा. प्रधान सचिव किंवा त्यांचे प्रतिनिधी
वित्त विभाग
सदस्य,
शिक्षण शुल्क समिती, मुंबई

मा. अध्यक्ष,
शिक्षण शुल्क समिती, मुंबई
तथा मा. सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
मुंबई

Scanned by CamScanner